सोपान गजानन पोखरकर व इतर
विरुध्द
रामदास महादु पोखरकर व इतर

## आदेश निशाणी क्र. २५

१. सदरचा अर्ज वादीने मुद्दे विशोधीत अथवा जादा मुद्दे ठरविण्याकरीता दाखल केला आहे.

२. दोन्ही पक्षांच्या वकीलांचे म्हणणे ऐकले.

३. वादींच्या वकीलांनी असे कथन केले की, सदरील दावा वादीने वाटपासाठी दाखल केला आहे. प्रतिवादीने यापुर्वी वाटप करताना दावा मिळकत ०० हे ३१ आर ही प्रतिवादींची खरेदी मिळकत आहे असे सांगितले होते. तसेच त्याबाबतचे कागदपत्र नंतर उपलब्ध करुन देण्याचे आश्वासन दिले होते. परंतु प्रतिवादीने अद्यापपर्यंत कोणतेही कागदपत्र उपलब्ध करुन दिलेले नाही. सदरील ०० हे ३१ आर क्षेत्रामध्ये वादी यांचा १/२ असा हिस्सा आहे. त्याकरताच वादीने सदरचा वाटपाचा दावा दाखल केला आहे. प्रतिवादी यांनी दाव्याच्या कामी कैफियत दाखल केली आहे. त्या कैफियतीमध्ये प्रतिवादी यांनी सदर क्षेत्र हे त्यांच्या खरेदीचे आहे असे नमुद केले आहे. त्यामुळे प्रतिवादी यांना जमिन गट नं.१३२९/१ मधुन ०० हे ३१ आर क्षेत्र हे त्यांच्या वडीलांचे खरेदीचे आहे हे शाबीत करणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. म्हणुन खालील मुद्दे काढणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक होणार आहे.

1) Whether defendants prove that the suit property bearing Gat No.1329/1 is admeasuring 00 H 31 R is purchased by Mahadu Anaji Pokharkar ?

2) Whether defendants prove that suit property bearing Gat No.1329/1 is admeasuring 00 H 31 R is self acquired property of Mahadu Anaji Pokharkar ?

वादीच्या वकीलांनी अर्ज मंजुर करुन सदरचे मुद्दे काढण्याची विनंती केली.

४. प्रतिवादींच्या वकीलांनी असे कथन केले की, सदरचा दावा वाटपाचा आहे. दि.०१/०४/२०२५ रोजी याच न्यायालयाने मुद्दे काढलेले आहे. मुद्दे काढतांना न्यायालयाने वादपत्रातील कथनांचा योग्य तो अभ्यास केलेला आहे. दावा शाबीत करण्याची जबाबदारी वादीची असते. वादी सदर मुद्दे काढून ती जबाबदारी प्रतिवादीवर टाकण्याचा प्रयत्न करीत आहे. सबब अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती केली.

५. अर्ज, त्यावरील म्हणणे, अभिलेखाचे व निशाणी क्र.२१ वरील मुद्दाचे अवलोकन केले.

६. दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश १४ नियम ५ प्रमाणे न्यायालयास हुकूमनामा काढण्यापुर्वी कोणत्याही वेळी स्वतः योग्य वाटेल अशा अटींवर वादमुद्दात विशोधन करता येईल किंवा जादा वाद मुद्दे ठरवता येतील आणि पक्षकारांमधील वादग्रस्त बाबींचा निर्णय करण्यासाठी आवश्यक असतील अशा सर्व सुधारणा किंवा जादा वाद मुद्दे अशाप्रकारे अनुक्रमे करण्यात किंवा ठरविण्यात येतील.

७. सदरचा दावा हा वाटप, ठराव व निरंतर ताकिदीकरीता दाखल केला आहे. वादीने वादपत्रामध्ये सदरची जमिन ही वादी व प्रतिवादी यांच्या एकत्र हिंदु कुटूंबाच्या वडीलोपार्जित मालकीची आहे असे नमुद केले आहे. तसेच वादीने प्रतिवादीने यापुर्वी वाटप करताना दावा मिळकत ०० हे ३१ आर ही प्रतिवादींची खरेदी मिळकत आहे असे सांगितले होते. तसेच त्याबाबतचे कागदपत्र नंतर उपलब्ध करुन देण्याचे आश्वासन दिले होते असे वादपत्रात नमुद केले आहे. तसेच प्रतिवादीने त्यांच्या कैफियतीमध्ये सदर दावा मिळकत गट नं.१३२९/१ मधील ०० हे ३१ आर ही जमिन त्यांची स्वकष्टार्जित व खरेदी मालकीची आहे असे स्पष्टपणे नमुद केलेले नाही. तसेच निशाणी क्र.२१ वर काढलेल्या मुद्दापैकी मुद्दा क्र.२ व ३ मध्ये वादीने अर्जात नमुद केलेले मुद्दे समाविष्ठ आहेत. त्यामुळे पुन्हा नव्याने मुद्दे काढण्याचे कोणतीही गरज नाही. म्हणुन सदरचा अर्ज नामंजुर करण्यास पात्र आहे. सबब खालील आदेश

पारीत करण्यात येतो.

**आदेश**

१) अर्ज नामंजुर करण्यात येतो.

२) खर्चाबाबत आदेश नाही.

**सही/-**

**(स्नेहा सुनिल पुळूजकर)**
**२रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, घोडेगाव**
**ता. आंबेगाव, जि. पुणे.**

**दि.०७/०३/ २०२६**
**घोडेगाव**

## <u>CERTIFICATE</u>

I affirm that the contents of this P.D.F. file are same word for word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Court | : | Smt. Sneha Sunil Pulujkar,<br>2nd Joint Civil Judge Junior Division,<br>Ghodegaon, Dist. Pune |
| Name of the Steno | : | J. S. Kaite, Steno Grade - III. |
| Order date | : | 07/03/2026 |
| Order signed by P.O. on | : | 07/03/2026 |
| Order uploaded on | : | 07/03/2026 |